**RNI No. MAHBIL /2009/31748**
**Reg. No. MCS /174/2016 -18**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक–अ-मध्य उप-विभाग

**वर्ष २, अंक ६२(४)] मंगळवार, ऑक्टोबर १८, २०१६/आश्विन २६, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये २६.००**

**असाधारण क्रमांक १०४**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑक्टोबर २०१६

**आदेश**

क्रमांक रानिआ/नपा/२०१६/प्र. क्र. ३९/का. ०६.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश सन २०१६ अन्वये नगरपरिषदेच्या अध्यक्ष पदाकरिता थेट निवडणूक घेण्याची तरतूद केली आहे ;

आणि ज्याअर्थी, या सुधारणानुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) चे कलम ५१अ-१अ च्या पोट-कलम ३ नुसार अध्यक्षाची निवडणूक परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबर एकाच वेळी घेण्यात येईल आणि नगरपरिषदेच्या निवडणुका घेण्यासंदर्भातील कार्यपद्धती अशा निवडणुकीस, योग्य त्या फेरफारांसह, लागू होईल अशी तरतूद आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा (अध्यक्ष पदासाठी थेट निवडणूक) नियम, २०१६ च्या नियम ७३ नुसार या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांशी सुसंगत असतील असे नगरपरिषदांच्या अध्यक्ष पदांच्या थेट निवडणूक घेण्याबाबतीत स्वतंत्रपणे निर्देश देऊ शकतील ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) चे कलम १०अ क पोट-कलम २ अन्वये प्राप्त अधिकारांनुसार आयोगाचे अधिकार आणि कर्तव्ये त्याच्या अधिनस्त किंवा शासनाच्या उप जिल्हाधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्याकडे किंवा नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्याकडे प्रदान करता येतील अशी तरतूद आहे ;

या अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खाली नमूद केल्याप्रमाणे आदेश देत आहे,—

**आदेश**

(१) खालील अनुसूचीच्या रकाना २ मध्ये नमूद अधिनियमाचे कलम, पोट-कलम आणि नियमांचे नियम, पोट-नियम इत्यादी अंतर्गत राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

(२) जिल्हाधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगाचे आदेश, निदेश सूचना आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) चे कलम १०-अ च्या पोट-कलम ४ मधील तरतुदींच्या अधिनस्त राहून कार्यवाही करावी.

**अनुसूची**

| अ. क्र. | महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अधिनियम, कलम क्रमांक महाराष्ट्र नगरपरिषदा (अध्यक्ष पदासाठी थेट निवडणूक) नियम, २०१६, मधील नियम क्रमांक | प्रदान केलेले अधिकार |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | अधिनियम कलम क्र. १९(१), (२) व (४) | संपूर्ण अधिकार |
| २ | नियम ६ | संपूर्ण अधिकार |

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

**ध. मा. कानेड,**

उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING,